# प्रेसनोट

| | | | |
|---|---|---|---|
| १. | युनिटचे नाव | :- | अॅन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई |
| २. | आरोपीचे नाव हुद्दा वर्ग व कार्यालयाचा पत्ता | :- | श्री. मोहन धाकु मोरे, वय- ४८ वर्षे, सह फायर अधिकारी (वर्ग-३) खोपोली नगर परीषद रा. गगनगिरी नगर, शिवालय बिल्डींग बिल्डींग नं. १० रूम नं. १० खोपोली जि. रायगड |
| ३ | अपराध घडला तारीख वेळ व ठिकाण | :- | दि. २०/०१/२०२० रोजी १६.११ते १७.२९ वा. तसेच १८.०४ वाजताचे चे दरम्यान अग्नीशामक कार्यालय, खोपोली नगरपरीषद ता. खालापूर जि. रायगड |
| ४. | लाचेची पडताळणी दिनांक | | दि. २०/०१/२०२० रोजी |
| ५. | मागणी केलेली रक्कम | :- | रू. ३,०००/- |
| ६. | स्विकारलेली रक्कम | :- | दिनांक २०/०१/२०२० रोजी १८.०४ वाजता रू. ३,०००/- |
| ७. | कारण | :- | तकारदार यांचे टॅंकर नंबर एमएच ४८ अेजी ७१४५ याचा पुणे मुंबई द्रुतगती महामार्गावर, ढेकू गावचे हद्दीत किमी ३६/६०० जवळ, खालापूर येथे ट्रेलर नंबर एमएच ४६ बीअेफ ७०५९ बरोबर अपघात झालेला असून सदर अपघातामध्ये तकारदार यांचा टॅन्करचे पुर्णपणे जळून नुकसान झालेले असल्याने त्याबाबत अग्नीशामक दल खोपोली यांचेकडुन फायर रिपोर्ट देणेकरीता |

तकारदार यांचे वडिल यांचे नावे दोन टॅंकर असुन त्याव्दारे ते कंपनीचे केमिकल पोहचविण्याचा व्यवसाय करतात. दिनांक १९/१२/२०१९ रोजी तकारदार यांचा टॅंकर नंबर एमएच ४८ अेजी ७१४५ याचा पुणे मुंबई द्रुतगती महामार्गावर, ढेकू गावचे हद्दीत किमी ३६/६०० जवळ, खालापूर येथे ट्रेलर नंबर एमएच ४६ बीअेफ ७०५९ बरोबर अपघात झालेला असून सदर अपघातामध्ये ट्रेलरचे मोठया प्रमाणात नुकसान झाले व तकारदार यांचा टॅंकर नंबर एमएच ४८ अेजी ७१४५ चे पुर्णपणे जळून नुकसान झालेले असल्याने सदर बाबत खोपोली पोलीस ठाणे गुन्हा रजि. नंबर ०२४९/२०१९ भादविस कलम २७९, मो.वा.अधि. १९८८ चे कलम १८४,१३४ तसेच सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंधक अधिनियम १९८४ चे कलम ३,४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

सदर अपघाताचे अनुषंगाने तकारदार यांनी त्यांचे अपघातग्रस्त टॅंकरचे बजाज अलायंझ विमा कंपनी कडून इन्सूरन्स क्लेम करण्यासाठी खोपोली फायर ब्रिगेड यांचा फायर रिपोर्ट आवश्यक असल्याने सदर फायर रिपोर्ट मिळण्याकरीता तकारदार यांनी तेथे कार्यरत असणारे लोकसेवक श्री. मोहन मोरे यांना प्रत्यक्ष भेटून विचारणा केली असता त्यांनी तकारदार यांचेकडे फायर रिपोर्ट मिळण्याकरीता अग्नीशामक दलाचे २,०००/- रू. चे चलनाव्यतिरीक्त रू. ३,०००/- लाचेची मागणी करून मागणी केलेल्या लाचेची रक्कम रू. ३,०००/- स्विकारली असता लोकसेवक श्री. मोहन मोरे यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे.

सदरची कारवाई अॅन्टी करप्शन ब्युरोचे पोलीस उप अधीक्षक श्री. रमेश चव्हाण, पोनि नितीन खैरनार, पोहवा/जाधव, पोहवा/पवार, पोना/ताम्हाणेकर, मपोना/बासरे, पोशि/माने, चापोशि/गायकवाड यांनी पार पाडली आहे.

नागरीकांनी अशाच प्रकारे भ्रष्टाचारासंबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे त्यासाठी खालील क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन पोलीस उप अधीक्षक श्री. रमेश चव्हाण, अॅन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई यांनी केले आहे.

अॅन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई
कार्यालय दुरध्वनी क्र. ०२२ - २७८३३३४४
टोल फ्री क्र. १०६४
मोबाईल क्र. ७०५७९६४७४७

( रमेश चव्हाण)
पोलीस उप अधीक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई

Scanned by CamScanner